जाक्र/सेशेयो/पकृविओ/प्र.क्र.०१/२०१७/ ५६६ /२०१७
कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
दिनांक - २५ /०९/२०१७

प्रति,

१) विभागीय कृषि सहसंचालक,

............... विभाग,...............(सर्व)

२) प्रकल्प संचालक आत्मा

...................... (सर्व)

विषय :- राष्ट्रीय शाश्वत शेती अभियानांतर्गत परंपरागत कृषि विकास योजना (सेंद्रिय शेती) सन २०१७-१८ मध्ये गट/समूह पध्दतीने राबविण्याबाबतच्या सुधारित मार्गदर्शक सूचना...

संदर्भः- १) कृषि आयुक्तालयाचे पत्र क्र. कृआ/सेंशेयो/प्र.क्र.१५/मा.सु/२०१५-१६/१४६/२०१६, दि. ०४/०३/२०१६

२) कृषि आयुक्तालयाचे पत्र क्र.कृआ/ मृसमृचा/ सेंशेयो/ मा.सु/ प्र.क्र.१५/ ३१८/ २०१६, दि. २६/०४/२०१६

३) कृषि आयुक्तालयाचे पत्र क्र.कृआ/मृसमृचा/सेंशेयो/प्र.क्र.१/मा.सु/२०१७-१८/३१०/२०१७ दि. १३/०४/२०१७

४) महाराष्ट्र कृषि व पदूम विभागाचा शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०१७/प्र.क्र/३१/१७-अे/मुंबई, दि. १९/०४/२०१७

५) महाराष्ट्र कृषि व पदूम विभागाचा शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०१७/प्र.क्र/३१/१७-अे/भाग-१/मुंबई, दि.१२.०९.२०१७

उपरोक्त संदर्भिय १, २ व ३ अन्वये परंपरागत कृषि विकास योजना (सेंद्रिय शेती) बाबतच्या मार्गदर्शक सूचना आपणांस या अगोदरच निर्गमित केलेल्या आहेत. तथापी संदर्भिय ४ व ५ अन्वये प्राप्त शासन धोरणानुसार डीबीटी प्रणाली लागू झाली असल्याने लाभार्थ्यांच्या बँक खात्यावर थेट अनूदान अदायगी करावयाची आहे.

त्यानूषंगाने या अगोदर निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचनामधील जोडपत्र अ मधील काही घटक/बाबीमध्ये बदल होणार आहे. मार्गदर्शक सूचनामधील सोबत जोडलेल्या अ.क्र. १.२.७, २.१.१, २.१.२, २.१.३, २.१.४, २.१.५, २.२.१, २.२.२, २.२.३, २.२.४, २.२.५(२) मध्ये डीबीटी प्रणालीच्या अधिन राहून बदल सूचविण्यात येत आहे.

सदरचा बदल लक्षात घेऊन त्याप्रमाणे पुढील कार्यवाही करावी.

सोबत - वरीलप्रमाणे (३ पृष्ठे)

कृषि संचालक
निविष्ठा व गुणनियंत्रण
कृषि आयुक्तालय,महाराष्ट्र राज्य, पुणे

| अ.क्र. | घटक | प्रथम वर्ष | द्वितीय वर्ष | तृतीय वर्ष | एकूण (रु.) | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| १.२.७ | NABL च्या मान्यता प्राप्त प्रयोगशाळेकडून शेती मालाचे तपासणी करणे. (रु.१०,०००/नमुन्यासाठी प्रती गट याप्रमाणे ८ नमुने प्रति वर्ष) | ० | ८०००० | ८०००० | १६०००० | गट प्रवर्तकाकडून NCOF/ RCOF / RC / HTC कडून पिकांचे नमुने शास्त्रीय पध्दतीने गोळा करणे, त्या नमुन्यांची चाचणी करणे याबाबत घेतलेल्या प्रशिक्षणाआधारे प्रत्येकी एका गटामधून (Cluster) सेंद्रिय उत्पादनाचे / सेंद्रीय मालाचे दुस-या व तिस-या वर्षात प्रत्येकी आठ नमुने किटकनाशके व रासायनिक अंश तपासणीसाठी NABL प्रयोगशाळेत पाठवावे. हि चाचणी NABL मान्यता प्राप्त शासकीय / खाजगी प्रयोगशाळेकडून करावी. मात्र खाजगी प्रयोगशाळेत नमूने पाठवित असताना शासनाच्या दराप्रमाणेच अनुदान देय राहील. प्रकल्प संचालक यांनी संबंधित प्रयोगशाळेस डीबीटीद्वारे थेट अनुदान वर्ग करावे. |
| २.१.१ | साधारण शेतीचे सेंद्रीय शेतीमध्ये रुपांतर करणे. रु.१०००/- प्रति एकर / ५० एकर क्षेत्रासाठी | ५०००० | ५०००० | ५०००० | १५०००० | यापूर्वीच्या संदर्भिय मार्गदर्शक सूचनाप्रमाणे अंमलबजावणी करण्यात यावी तथापी अनुदानाची रक्कम थेट लाभार्थीच्या नावे डीबीटी प्रणालीद्वारे अदा करण्यात यावी. |
| २.१.२ | सेंद्रीय बी-बियाणे खरेदी, सेंद्रीय बीज रोपवाटिका उभारणी करणे. रु.५००/- प्रती एकर/प्रती वर्ष/५० एकर क्षेत्रासाठी. | २५००० | २५००० | २५००० | ७५००० | यापूर्वीच्या संदर्भिय मार्गदर्शक सूचनाप्रमाणे अंमलबजावणी करण्यात यावी तथापी अनुदानाची रक्कम थेट लाभार्थीच्या नावे डीबीटी प्रणालीद्वारे अदा करण्यात यावी. |

| अ.क्र. | घटक | प्रथम वर्ष | द्वितीय वर्ष | तृतीय वर्ष | एकूण (रु.) | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| २.१.३ | पारंपारिक पध्दतीने सेंद्रीय निविष्ठा निर्मिती करणे. ३.१. बिजामृत, जीवामृत, बायोडायनामीक, सीपीपी कम्पोस्ट इ.औषधे निर्मिती करणे. रु.१५००/- प्रती युनिट/ प्रति एकर /५० एकर क्षेत्रासाठी | ७५००० | ० | ० | ७५००० | यापूर्वीच्या संदर्भिय मार्गदर्शक सूचनाप्रमाणे अंमलबजावणी करण्यात यावी तथापी अनूदानाची रक्कम थेट लाभार्थी / गटाच्या नावे असलेल्या बँक खात्यावर डीबीटी प्रणालीद्वारे अदा करण्यात यावी. |
| २.१.४ | नत्र स्थिरीकरण करणारे पिक लागवड करणे. (गिरी पुष्प, सिसबेनिया, इ.) रु.२०००/- प्रती एकर/५० एकर क्षेत्रासाठी | ५०००० | २५००० | २५००० | १००००० | यापूर्वीच्या संदर्भिय मार्गदर्शक सूचनाप्रमाणे अंमलबजावणी करण्यात यावी. अनूदानाची रक्कम लाभार्थी, महाबीज अथवा गटाचे नावे असलेल्या बँक खात्यावर डीबीटी प्रणालीद्वारे अदा करण्यात यावी. |
| २.१.५ | 2botanical extract जैविक वनस्पती घटकापासून अर्के/ बायोडायनॅमिक तरल किडरोधक/दशपर्णी पावडर निर्मिती युनिट उभारणे. (निम केक व निम ऑईल) रु.१०००/प्रती युनिट/ प्रती एकर प्रमाणे ५० एकर क्षेत्रासाठी. | ५०००० | ० | ० | ५०००० | यापूर्वीच्या संदर्भिय मार्गदर्शक सूचनाप्रमाणे अंमलबजावणी करण्यात यावी. अनूदानाची रक्कम लाभार्थी अथवा गटाचे नावे असलेल्या बँक खात्यावर डीबीटी प्रणालीद्वारे अदा करण्यात यावी. |
| २.२.१ | सेंद्रीय प्रमाणित द्रवरुपी (LIQUID) सेंद्रीय खते खरेदी करणे नत्र स्थिरीकरण करणारे घटक, स्फुरद विरघळणारे जीवाणू खते पालाश विरघळणारे जीवाणू खते खरेदी करणे, शासन मान्य ग्रेडची सेंद्रीय प्रमाणित सुक्ष्म मुलद्रव्ये आवश्यक तेनुसार रु.५००/प्रती एकर प्रमाणे ५० एकर क्षेत्रासाठी | २५००० | ० | ० | २५००० | प्रकल्प संचालक आत्मा यांनी शासकीय प्रयोगशाळा/कृषि विज्ञान केंद्र येथून त्यांचे स्वतःचे उत्पादीत निविष्ठांची खरेदी केल्यास अनूदानाची रक्कम संबंधित प्रयोगशाळा/ कृषि विज्ञान केंद्र यांना अदा करावी. लाभार्थी /गटाने बाहय स्त्रोताकडून खरेदी केलेली असल्यास डीबीटीद्वारे त्यांचे अधिकृत बँक खात्यावर अनूदान वर्ग करण्यात यावे. |

| अ.क्र. | घटक | प्रथम वर्ष | द्वितीय वर्ष | तृतीय वर्ष | एकूण (रु.) | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| २.२.२. | सेंद्रीय प्रमाणित द्रवरुपी (LIQUID), सेंद्रीय प्रमाणित निमयुक्त – करंजयुक्त बायोडायनामीक किडरोधक किटकनाशके, ( Trichoderma, viridae, Pseudomonas, fluorescens, Metarhizium, Beaviourie bassiana, Pacelomyces, verticilli) रु.५००/प्रती एकर प्रमाणे ५० एकर क्षेत्रासाठी | ० | २५००० | ० | २५००० | प्रकल्प संचालक आत्मा यांनी शासकीय प्रयोगशाळा/कृषि विज्ञान केंद्र येथून त्यांचे स्वतःचे उत्पादीत निविष्ठांची खरेदी केल्यास अनूदानाची रक्कम संबंधित प्रयोगशाळा/ कृषि विज्ञान केंद्र यांना अदा करावी. लाभार्थी /गटाने बाहय स्त्रोताकडून खरेदी केलेली असल्यास डीबीटीद्वारे त्यांचे अधिकृत बँक खात्यावर अनूदान वर्ग करण्यात यावे. |
| २.२.३ | निंबोळी अर्क, निंबोळी केक. रु.५००/प्रती एकर प्रमाणे ५० एकर क्षेत्रासाठी | ० | २५००० | ० | २५००० | गट / लाभार्थ्यांने खरेदी केलेल्या निविष्ठांच्या पोटी अनूदानाची रक्कम त्यांचे अधिकृत बँक खात्यावर डीबीटीद्वारे अदा करण्यात यावे. |
| २.२.४ | फॉस्फेटयुक्त सेंद्रीय खत (खत नियंत्रण आदेश १९८५ च्या तरतूदीनुसार) रु.१०००/प्रती एकर प्रमाणे ५० एकर क्षेत्रासाठी | ५०००० | ० | ० | ५०००० | गट / लाभार्थ्यांने खरेदी केलेल्या निविष्ठांच्या पोटी अनूदानाची रक्कम त्यांचे अधिकृत बँक खात्यावर डीबीटीद्वारे अदा करण्यात यावे. मात्र खरेदी केलेल्या निविष्ठा या खत नियंत्रण आदेश १९८५मधील तरतूदी नूसार मान्यता प्राप्त उत्पादकांकडून घेणे बंधनकारक राहील. |
| २.२.५ | २. बायोडायनॅमिक सी.पी.पी.युनिट उभारणी एका प्रकल्पात २५ सी.पी.पी. युनिट रु.१०००/प्रती युनिट याप्रमाणे प्रति वर्ष तयार करावे. | २५००० | २५००० | २५००० | ७५००० | गट / लाभार्थ्यांने खरेदी केलेल्या निविष्ठांच्या पोटी अनूदानाची रक्कम त्यांचे अधिकृत बँक खात्यावर डीबीटीद्वारे अदा करण्यात यावे. |